१३. वेदान्त विचार

॥श्री ज्ञानेश्वरमाउली ॥

१- अहंता अभिमानाला म्हणतात. अहंत्वोपाधी व चेतन यांच्या अध्यासाला जीव ही संज्ञा आहे; म्हणजे चेतन जेव्हां अहंतेशी तादात्म्य पावल्या सारखे समजते तेव्हां ते जीवदशेला येते. अहंता सोडून जीवदशा राहत नाही. ही अहंता किंवा जीव प्राणाशी तादात्म्य पावून व मरणसमयी गमन करणारा प्राण मीच आहे असे समजून प्राणच जात असला तरी मी जातो असे म्हणतो. म्हणून समर्थ म्हणतात -

जातो जीव तो प्राण ।

मी जाणत नाही हे म्हणणे अज्ञानवृत्तीशी तादात्म्य पावलेल्या अहंतेचे आहे. वासनावृत्तीशी तादात्म्य पावून वासनेनुसार कल्पिलेल्या देहावर आरूढ होणाऱ्या अहंतेचे 'मी जन्मलो' हे म्हणणे आहे. चेतन प्रथम अहंतेशी तादात्म्य पावून नंतर निरनिराळ्या वृत्तीशी तादात्म्य पावते व त्या निरनिराळ्या वृत्तींच्या धर्माची प्रतीति घेते असे अध्यास भाष्यात व **तद्गुण सारत्वातु तद्व्यपदेशः प्राज्ञवत् ।**या सूत्रावरील भाष्यात भगवान् आचार्यांनी सिद्ध केले आहे. वरील समर्थांच्या उक्त्यनुसार वृत्तितादात्म्याने जीवाचे भेद केल्यास आणखी पुष्कळ भेद करिता येतील. विश्व, तैजस, प्राज्ञ इत्यादि दुसरे भेद वेदान्तात दिलेले आहेत; पण कोणताहि भेद अहंतेला मात्र सोडून नाही. व्यष्टी अहंता व व्यष्टिवृत्तितादात्म्यता व्यष्टिजीवाचे ठिकाणी राहत असून समष्टिअहंता व समष्टिवृत्तितादात्म्यता समष्टिजीवाचे ठिकाणी म्हणजे हिरण्यगर्भाचे ठिकाणी असते व परमात्मा किंवा ईश्वर या दोन्ही अहंतेहून निराळा आहे.

२- सागराच्या पृष्ठभागावर लहरी उठत असते, म्हणून लहरीच्या प्रादुर्भावकाली सागराचा पृष्ठभाग जाणण्याकरिता लहरी सोडून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची गरज नसली तरी तो पृष्ठभाग लहरीवर नसतो किंवा तो लहरीही नव्हे; तर तो पृष्ठभाग लहरीच्या मुळाशी पहावा लागतो. त्याप्रमाणे अंतःकरणादि सर्व उपाधी एकाच अधिष्ठानावर भासत असल्यामुळे ईश्वराचा अनुभव घेण्याकरिता अंतःकरण सोडून कोठे जावे लागत नसले, तरी अंतःकरणादि उपाधी म्हणजे

नव्हे; तो अधिष्ठानरूप असल्यामुळे त्याचा अनुभव अंतःकरणादि उपाधीच्या मुळाशी घ्यावा लागतो; म्हणून तो अहंस्वरूप होऊ शकत नाही. अहं कळल्याबरोबर जीव कळतो. अहं कळल्याबरोबर ईश्वर कळत नाही.

३- ईश्वर, परमात्मा हे शब्द एकाच अर्थी वापरतात. गीता अ.१३.श्लो.२२ व अ.१५ श्लो.१७ या वरील ओव्यात श्रीज्ञानेश्वर महाराजांनी व त्यावरील भाष्यांत आचार्यांनी हे दोन्ही शब्द एकाच अर्थी वापरलेले आहेत. जो सर्वकर्ता तोच सर्वांतर्यामी आहे, सर्व व्यापक आहे. ईशशक्तीची उत्पत्ती कोठे वेदान्तात मानलेली नाही.

'मम योनिर्महद् ब्रह्म' या श्लोकाच्या श्रीज्ञानेश्वरीत व आचार्यभाष्यात 'मम महत् ब्रह्म' (माया) योनी (सर्व भूतानां कारणम्) म्हणजे माझी माया सर्व भूतांचे कारण आहे, असा दिला आहे. महत्ब्रह्म (म्हणजे ब्रह्म) ही (मम) माझी ईश्वराची योनी आहे म्हणजे उत्पत्तिस्थान आहे असा त्याचा अर्थ कोणी गोविंदसुतादि करितात तो बरोबर नाही.

४- ज्याप्रमाणे सागराचे तीन प्रकार होतात, एक लहरी, दुसरा लहरीच्या मुळाशी असणारा लहरीसंस्पृष्ठभाग व तिसरा लहरी निर्मुक्तभाग; त्याप्रमाणे उपाधिदृष्ट्या ब्रह्मचेतनाचे तीन भाग होतात. १. एक उपाधिगत जीव चेतन, २.दुसरा उपाध्युपहित ईश्वरचेतन व ३. तिसरा उपाधिनिर्मुक्त ब्रह्मचेतन. ज्याप्रमाणे लहरीच्या मुळाशी असणारा लहरीसंस्पृष्ट सागराचा भाग, लहरीनिर्मुक्त भागापासून कोणत्याही रीतीने भिन्न नसतो, एका सपाटीतच असतो व एकरूप असतो, पण लहरीच्या स्पर्शाला व अस्पर्शाला धरून त्याचे लहरीसंस्पृष्ट व लहरीनिर्मुक्त असे सागराच्या सपाटीचे नाममात्र दोन भाग होतात, त्याप्रमाणे उपाधिउपहित अशा ईश्वर चेतनात व उपाधिनिर्मुक्त अशा ब्रह्मचेतनात स्वरूपतः मुळीच भेद नाही. उपाधीला आधार म्हणून ईश्वर व उपाधीचा आधारही नाही ते ब्रह्म असा नाममात्र भेद आहे. ईश्वरचेतन केव्हांहि उपाध्युपहित असते, उपाध्यारूढ किंवा उपाधीशी तादात्म्य पावलेले नसते, म्हणून उपाधिदृष्टीनेही कर्ता देव तो ईश्वर व अंतर्यामी तो परमात्मा असा भेद ईश्वरचेतनात पडू शकत नाही.

५- सर्व संतमंडळीनी ''**आनंदपदीं जया म्हणती हरि**'' या एकनाथ वचनानुसार आनंदांशाचे ठिकाणी ईश्वरप्रतीति मानली आहे व आनंदांशाचे

ठिकाणी अहं राहत नाही हा अनुभव क्षणसमाधिवरून सर्वांना आहे. तेव्हां अहं हा ईश्वर आहे म्हणणे सर्व महात्म्यांच्या अनुभवाशी विरुद्ध आहे.

६- अहं हाच परमात्मा आहे असे म्हटल्यास जीवपरमात्म्यैक्य होईल तर त्यात वावगे कांही नाही; पण ते ऐक्य उपाधिनिरासापूर्वीच होत असल्यामुळे वेदान्तदर्शनाचा कांही उपयोग रहात नाही. अहं हाच परमात्मा आहे. असे मानून होणारे जीवपरमात्मैक्यच खरे ऐक्य होय असे गृहीत केल्यास सुखदुःखादि प्रारब्धभोग परमेश्वराला होतात, असे मानण्याचा अतिप्रसंग येतो.

७- ''मुक्त जीव अहंकाराहून भिन्न असतो असे कोणी म्हणत नाही'' असे गोविंदसुताचे म्हणणे आहे. पण विवेकचूडामणीत आचार्य म्हणतात -

यावत्स्यात्स्वस्य संबंधोऽहं कारणे दुरात्मना ।
तावन्न लेशमात्रापि मुक्तिवार्ता विलक्षणा ॥३८०॥

परमात्म्याने अहं अहं म्हणून गीतेत अहंचा उद्घोष केला आहे, एवढ्यावरून अहं हा परमात्मा आहे असे म्हणता येत नाही. द्वेषाने मारणाऱ्या परक्या मनुष्याची व प्रेमाने आईची ताडनक्रिया सारखीच असते, पण पहिल्याची क्रिया विकारतादात्म्याने होत असून आईच्या क्रियेत विकाराचा गंधहि नसतो; त्याप्रमाणे जीवाची क्रिया अहंतेशी तादात्म्य पावत असते, म्हणून अहं जीवाचे स्वरूप होऊं शकते व परमात्मा नेहमी अहंहून निराळा असतो, म्हणून तो अहंस्वरूप होऊ शकत नाही.

८- मुक्तांचे ठिकाणी प्रारब्धवेगामुळे बाधित अहंत्व असण्याचा संभव आहे. पण परमात्म्याच्या ठिकाणी दिसणारे अहंत्व परमात्म्याच्या अहंत्वारूढत्वामुळे असते, असे नसून जीवाच्या अहंतारूढत्वामुळे जीवांना ते परमेश्वराचे ठिकाणीहि दिसते. काविळाच्या रोग्याला जसे जगच पिवळे दिसते, तशातला हा प्रकार आहे. कंसादिकांचा वध करण्याकरिता परमेश्वराला अहंस्वरूप होण्याचे कांहीच कारण नाही, कारण अवतारकालीहि परमेश्वर सत्यसंकल्पच असतो. **''असो रूपक हे तो ईश्वर''** इत्यादि ज्ञानेश्वरीतील ओव्यात परमात्मा अहंस्वरूप आहे, असे दाखविले नसून, **सकल भूतांचा अहंकार । पांघरोनी निरंतर । उल्लसत असे ॥** या तीन चरणांनी समष्ट्यहंकारोपहित म्हणजे समष्टि अहंकार ज्याच्यावर भासतो तो परमात्मा होय असे सांगितले आहे. येथे लक्षित लक्षणा आहे. म्हणून त्या ओवीचा अर्थ समष्टि अहंकाररूप परमात्मा आहे असा होत नाही. परमात्मा सर्वांतर्यामी

असल्यामुळे प्रत्येक जीवाच्या हृदयातहि आहेच, म्हणून वरील ब्रह्मांडाधिष्ठान तत्पद परमेश्वराला समष्ट्यहंकारोपहितत्वाने दाखवून, पिंडाधिष्ठान तत्पद परमेश्वराला,

अर्जुनपण न घेता । मी ऐसे जे पंडुसुता । उठे ते तत्वता । तयाचे रूप ॥

या ओवीने व्यष्ट्यहंकारोपहितत्वाने दाखविले आहे. असे न मानता अहं हाच परमात्मा आहे असे मानल्यास सगुण ध्येयैकरूप सविकल्प समाधि सिद्ध होणार नाही; कारण अहं आहे तोपर्यंत ध्यान असते. अहं लीन झाला म्हणजे पुढे समाधि सिद्ध होतो असे योगशास्त्राचे मत आहे.

९- वेदान्तांत प्रक्रिया व सिद्धान्त असे दोन भाग आहेत. पैकी प्रक्रियाभाग विद्यारण्याच्या ह्यैसाब्रह्मज्ञानाप्रमाणे अनेक प्रकारचा राहू शकत असला तरी सिद्धान्त भागात कधी कोणाचा विरोध होऊ शकत नाही. भगवान् आचार्यांचे खंडणमंडण याच भागाला धरून आहे. याच भागाला ज्ञानभाग असे नांव असून प्रक्रिया भागाला उपास्ति हे नांव आहे. ज्ञानभागात शब्दावाचून दुसऱ्या कोण्या स्वतंत्र रीतीने अनुभव येतो असे मानलेले कोठे दिसत नाही. कारण श्रवण, मनन, निदिध्यासन व साक्षात्कार असा त्यातील अनुभवक्रम असतो म्हणून या भाष्यात श्रुत्यर्थाचा व अनुभवाचा कधी विरोध नसतो. उपास्तीनेहि हाच अनुभव दृढ करावयाचा असतो. तरी हा भाग प्रत्येकाच्या उपाधिनुसार सांगितला जात असल्यामुळे प्रथम अनुभवाचा व उपास्तीचा विरोध भासतो, पण पुढे पुढे तो नाहीसा होऊन सर्वांना एकच अनुभव येतो. प्रक्रियेच्या दृष्टीने अहं हाच ईश्वर होय असे सांगून तद्द्वारा ईश्वरबोध करावयाचा असल्यास, या दृष्टीने अहं हा ईश्वर होय हे मीहि मानतो. कारण ''मनोब्रह्म'' इत्यादी प्रक्रिया सांगितल्या आहेतच; पण सिद्धान्तदृष्टीने मन हे ब्रह्म नाही. हे सत्य असून प्रक्रियेतहि ''मनोब्रह्म'' या भावनेचा त्याग करून मनोपहित ते ब्रह्म असा बोध घ्यावा लागतो, असे आचार्यांनी ब्रह्मसूत्रात सिद्ध केले आहे. त्याप्रमाणे येथेहि अहं हाच ईश्वर आहे असे ध्यान करीत ते ध्यान दृढ झाल्यावर खरा ईश्वरबोध अहंत्वोपहितत्वानेच घ्यावा लागेल.

१०- परमात्मा व्यापक असल्यामुळे त्याच्या ठिकाणी 'आतबाहेर' ही भाषा नाही हे खरे, तरीपण समुद्राच्या ज्या देशावर लहरी उठली त्या देशावरील लहरीचा आधार म्हणून ज्याप्रमाणे लहरीच्या मुळाशी असणारा समुद्राचा पृष्ठभाग

इतर सबंध पृष्ठभागाहून पृथक पडला नसताहि आपण तेवढाच पृष्ठभाग लहरीला आधार आहे असे म्हणतो, त्याप्रमाणे अहंतादिक जेवढा कांही ज्ञेयभाग आहे त्याला आधारभूत असणारे ब्रह्म यत्किंचितहि परिच्छिन्न किंवा मर्यादित न होता ईश्वर किंवा परमात्मसंज्ञेस प्राप्त होते. याप्रमाणे अहंतादिक सर्व ज्ञेय पदार्थांचा संबंध घेऊन त्यांना आधारभूत असणाऱ्या चेतनाला जरी आपण ईश्वर म्हणतो तरी तो ज्ञेयभाग कांही ईश्वर होऊ शकत नाही. प्रतिबिंबाच्या अपेक्षेने सूर्याला बिंब म्हटले म्हणून प्रतिबिंब म्हणजे सूर्य असे म्हणता येईल काय?

११- राजसेवकांच्या ठिकाणी असणाऱ्या शक्ती राजाच्याच असतात म्हणून त्या शक्तीचा व त्यांच्या कार्याचा आरोप जसा राजावरच होतो, राजसेवकावर होत नाही त्याप्रमाणे, **अगजगदोकसामखिलशक्त्यवबोधक ते** या श्रुतिगीतातील वचनानुसार किंवा, **मत्तः सर्वं प्रवर्तते** या गीतावचनानुसार आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक इत्यादि पदार्थातील शक्तींचा व त्याच्या कार्यांचा आरोप परमात्म्यावरच होतो. आधिभौतिकादि पदार्थावर होत नाही. **योगशास्त्र सर्व भावनाप्रधान असल्यामुळे श्वासादिकांचे ठिकाणी सोहंभावनाच करावी लागते.** सोहंश्वास ईश्वर आहे हे ज्ञान नव्हे. अहंत्व सुषुप्तीत लीन असते, मरणसमयी श्वासोच्छ्वास राहत नाही. तेव्हां या दोन्ही ईश्वराची अव्यापकता मानावी लागेल. सर्व राजसेवकांच्या ठिकाणी राजाच्या शक्ती विभागल्या असल्या व त्यांच्याद्वारा जरी तो राजा नानाप्रकारच्या शक्तीचे कार्य करीत असला तरी प्रधानापासून तो तहत कनिष्ठ दर्जाच्या सर्व सेवकापर्यंत जेवढे सेवक असतात त्या सर्वांहून निराळा सर्व शक्तिसमन्वित असा एक राजा असतोच. त्याचप्रमाणे धारणपोषणादि जेवढ्या शक्ती असतील तेवढ्या निरनिराळ्या आधिभौतिकादि पदार्थद्वारा जरी अभिव्यक्त होत असल्या तरी त्या सर्व पदार्थाहून निराळा सर्वशक्तिसमन्वित असा एक चेतन पदार्थ (ईश्वर) मानल्याशिवाय गत्यंतर नाही. श्वासोच्छ्वास परमात्मा होऊ शकत नाही. कारण प्राणमयकोशनिराकरणाबरोबरच त्याचे निराकरण करण्यास वेदान्तांत सांगितले आहे.

१२- ''अहं हाच ईश्वर आहे असे मानल्याने शास्त्र व्यर्थ ठरत नाही; कारण अहं ईश्वर खरा, पण अहं म्हणजे कोण? दृश्य किंवा द्रष्टा? हे कळण्याकरिता शास्त्रप्रवृत्ती सार्थ आहे'' असे रा. गोविंदसुत म्हणतात. अहं हा

चिदचिद्ग्रंथीरूप आहे म्हणून शास्त्रचिंतनाने ग्रंथीनाश झाल्यावर 'मी अचिद्रूप आहे हा अध्यास जाऊन मी चेतनरूप आहे' अशी वृत्ती उत्पन्न झाली तरी हे जीवाचेच स्वरूप होय, परमात्म्याचे नव्हे. 'त्या वृत्तीला आधारभूत चेतन तो परमात्मा' म्हटला जातो.

सारांश, देहोऽहं ही वृत्ती असो किंवा अहं ब्रह्मास्मि ही वृत्ती असो; या वृत्तीत अभिव्यक्त झालेले चेतन ईश्वरचेतन नव्हे. ईश्वरचेतन दोन्ही वृत्तीला आधारभूत असते ते कोणत्याच वृत्तीवर आरूढ नसते.

न विरोधो न चोत्पत्तिः । हा श्लोक प्रमाण देऊन रा. गोविंदसुत म्हणतात ''अहं हाच ईश्वर म्हणण्यास काय भीति आहे'' पण या श्रुतिवरील आचार्यभाष्य जर ते वाचून पाहतील तर असे विधान करण्यास भीती आहे कीं नाही हे त्यांना कळेल. या श्रुतीत सर्वभाव मिथ्या ठरवून मिथ्याभाव अधिष्ठानस्वरूप असतात, असे दाखविले आहे. त्यात अहमादिक सर्वच बाधित केले आहे. त्यात मुक्तता व बद्धता हे दोन्ही भाव अविद्यात्मकच ठरविलेले आहेत. ज्याला मी पूर्वी बद्ध होतो असे वाटत असेल त्यालाच मी मुक्त आहे असे वाटेल; पण वास्तविक हे दोन्ही भाव खोटे आहेत. म्हणून कोणताच अहंकार या स्थितीत राहत नसल्यामुळे व ही स्थिती जीवन्मुक्तांना अभ्यासाने प्राप्त होत असून परमेश्वराला नित्य सिद्ध असल्यामुळे, जीवन्मुक्त किंवा परमात्मा हे दोघेही अहंस्वरूप नसतात.

१३ - परमात्मा भक्ताहून पृथक नसतो. 'पृथगिव' असतो हे शास्त्रप्रतीति, गुरुप्रतीति व आत्मप्रतीति अशा तीन रीतीने श्रीगुलाबरावमहाराजांनी सिद्ध केले आहे.

वेगळेपणे पहाणे घडे । तेणे वृत्ति शून्यत्वी पडे ॥

ही समर्थोक्ती सत्यभेदविषयक आहे. श्रवणापासून येणारा अनुभव व गुरूपासून येणारा अनुभव भिन्न नसतो. श्रुतीने जीवब्रह्मैक्य सांगितले आहे व गुरुहि तेच करून देतात. वाच्यांशाने जीवेश ऐक्य होत नाही, असेच सांगितले आहे. अर्थात् लक्ष्यांशानेच जीवेशैक्य श्रुती सांगते. व गुरुहि तसेच ऐक्य करून देतात; मग गुरुपासून येणारा अनुभव भिन्न काय असणार? गुरूचा उपयोग उपाध्यनुसार प्रक्रिया सांगण्यात आहे व प्रक्रिया व सिद्धान्त एक नव्हे हे वर दाखविलेच आहे.

१४ - अदर्शनरूप याचा अर्थ, जीवाच्या लिंगशरीरावर अव्यक्त स्वरूप

होणे, असा नसून दृष्टिगोचर न होणे इतकाच आहे. ज्ञान होईपर्यंत कोणत्याच जीवाचे अव्यक्त लिंगशरीर नष्ट होत नाही. पण ज्ञान झाल्यावर व प्रारब्ध संपल्यावर ते नष्ट होते व पुनः ते घेता येत नाही ईश्वराला प्रारब्ध नाही म्हणून वासना नाही व तो नित्य ज्ञानी आहे, तेव्हां त्याचे शरीर जीवाच्या वासनात्मक शरीराप्रमाणे होऊ शकत नाही. ब्रह्मसूत्र ४/४/७ मध्ये प्रारब्ध संपले आहे म्हणून लिंग शरीर नष्ट झाले आहे, अशा विदेहमुक्तांना परमेश्वरभावापत्ती सांगितली आहे; म्हणून परमात्म्याचे शरीर जीवाच्या लिंग शरीराप्रमाणे अव्यक्त व यावज्ज्ञान नित्य नसून ज्ञानानंतरहि व विदेहमुक्तितही ते नित्य आहे असे सिद्ध होते.

१५ - अहं हा परमात्मा नव्हे, हा पूर्वपक्ष नाही तर सिद्धान्त आहे. पूर्वपक्षाला बहुवचनसाधकता नसते, बहुवचनविरोधता असते. या सिद्धान्ताला आचार्यादि सर्व गुरुजनांची संमति आहे; आत्मप्रतीतिहि याला अनुकूलच आहे. ती अशी की, बद्धदशेपासून मुक्तदशेपर्यंत त्वंपदजीवप्रतीति अहंचे ठिकाणी येते. मी ब्रह्म आहे या वृत्तिकाली मी म्हणणारा जीवच असून तो उपहित ब्रह्माशी ऐक्य करीत असतो. मी गोडी घेतली नसली तरी साखर गोडच असते असा मी सिद्धान्त केल्यास जसा तो पूर्वपक्ष होऊ शकत नाही त्याप्रमाणे अहं हा परमात्मा नव्हे असे सर्वत्र सांगितले असता अनुभव नसला म्हणून, अहं हा परमात्मा नव्हे हे म्हणणे पूर्वपक्षाचे होय, सिद्धान्तभूत नव्हे असे म्हणता येईल काय?

दुसरी गोष्ट अशी की, लक्षणावृत्तीने कळणारी वस्तू शब्दाने सांगताना ती औपाधिकच दाखविली जाते, पण त्या वस्तूच्या अत्यंत जवळचा तो उपाधि असायला पाहिजे. उदाहरणार्थ 'अ' ला 'ब' ची ओळख पटण्याकरिता त्याची कांही खूण सांगावयाची असल्यास, ती खूण अशी असली पाहिजे की, तिजवरून 'अ' ला 'ब' ची चटकन ओळख पटेल. जेवढी ती न कळणारी राहील तेवढे त्या खुणेवरून 'ब' ला ओळखणे कठीण जाईल; व जेवढी ती जास्त संलग्न असणारी राहील तेवढे त्या खुणेवरून 'ब' ला लवकर ओळखता येईल. अहं हा अत्यंत जवळचा उपाधि आहे. त्याला धरून आत्मबोध जसजसा लवकर होतो, तसा देहादि उपाधीला घेऊन होत नाही, म्हणून श्रुतीत व आचार्यांच्या ग्रंथांत जीवाचे शुद्ध स्वरूप कळण्याकरिता अहं उपाधि घेऊन आत्मविवेकाला सुरुवात केली आहे. अहं हा जीवदशेचा प्रथम उपाधि होय. अर्थात ज्याप्रमाणे समुद्राचे पाणी लहरीरूप झाल्यावर *लहरी, *लहरीला साक्षात् आधारभूत असणारा समुद्राचा पृष्ठभाग, व *लहरीविरहित शुद्धभाग, असे समुद्राच्या पाण्याचे तीन भाग होतात, त्याप्रमाणेच अहंत्वोपाधि स्फुरण पावल्याबरोबर, *अहं तो जीव, *अहंतेला उपहित तो ईश्वर व *अहंविरहित शुद्ध ते ब्रह्म असे चेतनाचे भाग होतात. ईश्वर नेहमी उपहितच राहणार म्हणून तो अहंस्वरूप कधी होऊ शकत नाही.

१६- आनुभविक वेदान्त असो किंवा शाब्दिक वेदान्त असो तरी तो पूर्वाचार्यांच्या शब्दाशी जुळता असावा हे चांगले. देवता व परमात्मा एक नाही. त्या कार्यरूपच आहेत. फक्त परमात्माच कारणरूपाने सर्वत्र व्यापक आहे. देवतांच्या व्यापकत्वाचे क्षेत्र मर्यादित आहे. परमात्मा अहंहून निराळा असल्यामुळेच हिरण्यागर्भापासून तर व्यष्टिजीवापर्यंत अहं तादात्माने म्हणजे अहंस्वरूप होऊन जेवढे कांही कार्यभूत चेतन आहे त्या सर्वांच्या ठिकाणी व्यापून राहून त्याचे नियमन करीत असतो. नंतर हिरण्यगर्भादि जीवापासून हे व्यापकतेचे व नियमाचे क्षेत्र कमी होत गेले आहे. हिरण्यगर्भ समष्टित्वाने ब्रह्मांडाचा अभिमान धरून आपल्या ब्रह्मांडाचे नियमन करितो. ब्रह्मांडातर्गत सूर्यादि देवता त्यांना नियमित करून दिलेल्या देशांचा समाष्टित्वानेच अभिमान धरून त्या देशाचे नियमन करतात, म्हणून ब्रह्मांडात कारणरूपाने देवता राहतात असे मानणे श्रुतिविरुद्ध आहे. सर्व जीवांच्या हस्तांची देवता इंद्र आहे पण सर्व जीवांच्या हस्तांचा अभिमान त्यांना पृथक् पृथक् धरावा लागत नाही. सर्वांच्या हस्तांचा ते समष्टित्वाने अभिमान धरितात. सूर्य नेत्राची देवता आहे. पण सूर्यदेवता म्हणजे सूर्यगोल नसून सूर्य गोलादि विवक्षित अशा आधिभौतिक प्रकाशाचा अभिमान धरणारे चेतन होय. एका नोकराच्या ठिकाणी असणाऱ्या मर्यादित सत्तेचा नोकर अभिमानी असतो. वरिष्ठ अधिकारी त्याच्या माताहात असणाऱ्या सर्व नोकरांच्या सत्तेचा समष्टित्वाने अभिमानी असतो. ही समष्टित्वाभिमानाची परंपरा वाढत जाऊन जशी राजापर्यंत जाते व आपल्या अभिमानानुसार व्यष्टित्वाने किंवा समष्टित्वाने कर्ता भोक्ता होतो, तशीच गोष्ट देवतांची आहे. समष्टि अभिमान धारण करणारा व्यष्टि अभिमान धारण करणाऱ्याचे ठिकाणी सापडणे शक्य नाही. म्हणून सूर्यदेवता आपल्या नेत्राच्या ठिकाणी न दिसली तरी सूर्यगोल समष्टि नेत्रेंद्रिय या नियत देशावर धारणा करून तिला पाहता येते. कारण सर्व देवता विग्रहवान आहेत असे ब्रह्मसूत्रात आचार्य

म्हणतात.

१७- तत्वी गुंतला म्हणे कोहं । विचारे पाहता म्हणे सोहं ।
अनन्य होता अहं सोहं । मावळले ।

या ओवीत गोविंदसुताना अहं हाच ईश्वर होय असे कसे वाटते हे समजत नाही. या ओवीचे प्रथम चरण देहादि अहंतेला धरून असून, दुसरे ज्ञानाहंतेला धरून आहे व तिसरे व चवथे चरण जीवन्मुक्त पुरुष व परमात्मा यांना लागू आहे. त्यांच्या ठिकाणी अहंस्वरूपता मुळीच नसते असेंच या दोन चरणांनी दाखविले आहे.

१८- निर्गुणस्वरूप सगुण होते असे म्हणताना ते अहंकारस्वरूप होते असे म्हणता येणे शक्य नाही. या सगुणत्वाचे उदाहरण गीतेवरील परमार्थप्रपा नामक टीकेत व सूतसंहिता आणि त्यावरील विद्यारण्यकृत टीकेत दिले आहे. पातळ घृत व थिजलेले घृत, किंवा सूर्यप्रकाश व सूर्यबिंब यांच्या भेदाप्रमाणे निर्गुण व सगुण यांचा भेद आहे. असे ते टीकाकार म्हणतात.

१९- ज्याला व्युत्थानात समाधि साधला नाही त्या जीवाची पूर्ण ईश्वररैक्यता न झाल्यामुळे म्हणजे निर्गुण स्वरूपाशी ऐक्य होऊन पराभक्तीच्या परिपाकाने होणारे जे सगुणस्वरूपाशी ऐक्य ते न झाल्यामुळे, जरी तो सर्वज्ञता व सर्व शक्तिमत्ता या दृष्टीने ईश्वराहून कमी असला तरी परमेश्वराच्या दोन्ही स्वरूपाशी ऐक्य पावलेल्यात व परमेश्वरात कांहीच भेद नसतो. तो परमेश्वरच होय अशा जीवन्मुक्तांची उपासना भारतात सांगितली आहे. भगवत्सेवेपेक्षा संतसेवेचे महत्व याच दृष्टीने आहे. परमेश्वरनाम न घेता ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर किंवा तुकाराम तुकाराम म्हणणारा उद्धरून जाणार नाही असे कोठे म्हटले आहे ? किंवा नित्यमुक्त व आधुनिकमुक्त या दृष्टीने परमात्मा व जीव यांच्यात भेद केला तरी आमचा विरोध नाही. पण जीवाला प्रारब्ध असल्यामुळे त्याचे व्युत्थान होत असते म्हणून त्याचे ठिकाणी व्युत्थानात गृहीत अहंत्व असते; पण येथेहि मुक्त पुरुष मी अहंस्वरूप आहे असे समजत नसतो. मग ज्याला प्रारब्ध नाही म्हणून व्युत्थान नाही असा परमात्मा अहंस्वरूप कसा व्हावा ?

२०- श्रीगुलाबराव महाराज म्हणतात,

एवं देहबुद्धीने दीनता । तदा गळे देहाहंता ।
आणि जीव बुद्धीने तत्वता । तस्यैवाहंता भक्ति साधे ।।१।।
ममैवांशो हेहि जाण । मध्यसंवेग भक्तिलक्षण ।
आत्मबुद्ध्या भक्तिसंपन्न । सएवाहं इतिरीती ।।२।।
त्यांतील अहंता वेगळी करून । नाहीसा होऊन आपण ।
आपणासहित सएव भगवान् । पहाणें की ।।३।।
ही उत्तम पराभक्ति । बोलिली आहे समर्थी ।
दासबोधीं यथारीति । श्रुतियुक्ति अनुभवें ।।४।।

ह्या ओव्या म्हणजे माझ्या प्रतिपादनाचे मूळ आहे असे समजावे.

०००